# सृष्टिज्ञान

**संस्थापक :**
कै.प्राचार्य गो. रा. परांजपे
कै. डॉ. दि. धों. कर्वे
कै. प्रा. स. बा. हुदलीकर

**मार्गदर्शक :**
डॉ. रघुनाथ माशेलकर
डॉ. अनिल काकोडकर
डॉ. विजय भटकर
डॉ. शेखर मांडे

**सल्लागार :**
ले. ज. डॉ. माधुरी कानिटकर (निवृत्त)
डॉ. भूषण पटवर्धन
डॉ. प्रदीप कुरुलकर

**संचालक :**
डॉ. योगेश शौचे
डॉ. मानसी माळगांवकर
डॉ. क. कृ. क्षीरसागर
श्री. र. वि. कुलकर्णी

**संपादक :**
रमेश दाते

**सहसंपादक :**
डॉ. प्रभाकर इंगळे
सत्यजित जोशी

**मुखपृष्ठ मांडणी व सजावट :**
मिलिंद जोशी, अनुपम क्रिएशन्स, पुणे

या अंकाची किंमत : रु. ४०.००
वार्षिक वर्गणी : रु. ४००.००

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**
‘सृष्टिज्ञान’, c/o विज्ञान भारती
काशी निवास, सुभाषनगर गल्ली क्र.६,
१२६१ शुक्रवार पेठ, पुणे ४११००२.
फोन नं.: ०२०–२४४७४२९५
ई–मेल : sci.vibha@gmail.com

# दिवस खडतर परीक्षेचे

खडतर परीक्षा पाहणाऱ्यांमध्ये काळ हा मोठा अक्राळ विक्राळ परीक्षक आहे. याच्या परीक्षेचा ना अभ्यासक्रम, ना पाठ्यपुस्तक, ना कालमर्यादा आणि कोणी याच्या परीक्षेला उतरण्याचा प्रयत्न केला तर हा अधिकाधिक कठीण परीक्षा घेत जातो. याचे उत्तम उदाहरण ''सृष्टिज्ञान''च्या निमित्ताने आपणास बघावयास मिळत आहे. सुमारे, ९५ वर्षांपुर्वी म्हणजे एक जानेवारी १९२८ या दिवशी मराठी भाषेतून विज्ञान प्रसार करण्यासाठी सृष्टिज्ञान मासिक सुरू झाले. मासिकाच्या माध्यमातून शास्त्रीय माहिती सोप्या, सुलभ व रंजक पध्दतीने सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवावी या कल्पनेचे जनक प्राध्यापक गो.रा.परांजपे. त्यांनी प्राध्यापक दि.धों.कर्वे, स.बा. हुदलीकर यांच्या मदतीने हे उपयुक्त काम मोठ्या जिकिरीने सुरू केले आणि ते आजतागायत चालू राहिले आहे. एखाद्या नियतकालिकाने सलग १००० अंक प्रसिध्द करणे हे जागतिक पातळीवर दखल घेण्याजोगे काम समजले जाते. हा तर ११३९ वा अंक आहे. काळाच्या परीक्षेत हे उल्लेखनीय यश प्राप्त केल्यामुळेच की काय ''सृष्टिज्ञान'' वर काळ कोपला व त्याने अधिकच खडतर परीक्षा पाहण्याचे ठरविले आहे असे दिसते.

या परिस्थितीत कशाच्या आधारावर विज्ञान भारती ने हे मासिक चालविण्याचे ठरविले व त्याची जबाबदारी माझ्यावर दिली? याचे उत्तर आहे ते म्हणजे ''कठीण समय येता सद्गुरु स्मरावे'' या विचारधारेमध्ये. या मासिकाला चार विज्ञान गुरु लाभले आहेत असे प्रथमदर्शनी आपणास वाटेल कारण या अंकामध्ये चार मार्गदर्शकांचे आशीर्वाद आहेत.

पण हे पूर्ण सत्य नाही. गेल्या साडेनऊ दशकांची कामगिरी यशस्वी करण्यात त्या त्या काळातील वैज्ञानिक, संशोधक, शास्त्रज्ञ, विज्ञान प्रेमी प्राध्यापक आणि लेखक यांची मोलाची मदत झाली. गो.रा. परांजपे यांचा ६ मार्च हा तर स्मृतिदिन. त्या व्यतिरिक्त अनेक उल्लेख व्यक्तिंचे अदृश्य आशीर्वचन माझ्या डोळ्यासमोर आहेत. ही यादी मारुतीच्या शेपटीप्रमाणे आहे, पण त्यातले काही उदाहरणे

---

या अंकातील लेख त्या त्या विषयांतील तज्ञांनी लिहिलेले आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

देण्यासारखे, म्हणजे प्राध्यापक गो.रा. परंजपे, प्राध्यापक दिनकर धोंडो कर्वे, प्राध्यापक सत्यबोध बाळकृष्ण हुदलीकर प्राध्यापक भाजेकर, प्राध्यापक आजरेकर, प्रा. आवटी, प्रा. चिपळूणकर प्रा. गोखले, प्रा. चंद्रात्रे, प्रा. नारळीकर, प्रा. सोवनी, प्रा. वर्तक, कितीतरी नावे समोर आहेत आणि त्याहीपेक्षा महत्वाचे, एक अदृश्य मार्गदर्शक आहेत. त्यांचे वचन म्हणजे ''माझा मऱ्हाठाची बोल कौतुके'' किंवा ''इये मऱ्हाठीचिये नगरी, (विज्ञानाचा) सुकाळ करी'' नाव सागायला नकोच. तुम्ही ओळखले असेलच की, हे तर ज्ञानियांचा राजा श्री. ज्ञानदेव यांचे वचन आहे म्हणून आम्हाला काळाचे भय नाही.

*✻ तीर्थ विठ्ठल, क्षेत्र विठ्ठल ✻*

या पंडित भीमसेन जोशी यांनी गायलेल्या संत नामदेव महाराज यांच्या अंभंगाप्रमाणे म्हणावेसे वाटते,

*तीर्थ विज्ञान, क्षेत्र विज्ञान ।*
*देव विज्ञान, देवपूजा विज्ञान ।*
*माता विज्ञान, पिता विज्ञान ।*
*बंधु विज्ञान, गोत्र विज्ञान ।*
*गुरु विज्ञान, गुरुदेवता विज्ञान ।*
*निदान विज्ञान, निरंतर विज्ञान ।*
*✻वि.भा.✻ म्हणे, मज विज्ञान सापडले*
*म्हणोनी कळी काळा नाही, पाड नाही.*

विज्ञान व अध्यात्म यांचा समन्वय हाच विज्ञानभारतीचा धर्म आहे. धर्म, अर्थ, काम, व मोक्ष ही भारतीय संस्कृतीची चतु:सूत्री आहे. या चतु:सुत्रीच्या आधारेच प्राचीन भारत हा विश्वगुरू तर होताच, परंतु त्याच बरोबर विज्ञान–तंत्रज्ञान, व्यापार उदीम, दळणवळण, इत्यादींनी सर्वांगीण समृद्ध, संपन्न आणि विश्वात अग्रेसर होता. येथे सोन्याचा धूर निघत होता असे म्हटले जाई. हे वैभव लुटण्यासाठी च परकीय आक्रमणे झाली. परकीय सत्ता आल्या. या सत्ताधाऱ्यांनी पहिले आक्रमण भारतीय संस्कृतीवर केले. विज्ञान तंत्रज्ञानात अग्रेसर असूनही, प्राचीन भारतीयांनी या ज्ञानाचा उपयोग नैसर्गिक संपत्ती ओरबाडून, अनिर्बंध भोगांसाठी केव्हाच केला नाही. आपले विज्ञान तंत्रज्ञान निसर्ग पूरकच नव्हे, तर निसर्ग संवर्धक होते. धर्माधिष्ठित राहूनच कामपूर्ती व अर्थार्जन होत होते व आम जनतेचे लक्ष ईश्वराच्या सानिध्यात राहणे हे होते. विज्ञानाच्या सहाय्याने इहलौकिक सुखोपभोग व अध्यात्माच्या मदतीने पारलौकिक सुख मिळविणे, हे तत्वज्ञान संपूर्ण समाजाने अंगीकारले होते. सर्वांना संपूर्ण स्वातंत्र्य होते, समता होती. एवढेच नव्हे तर ''वसुधैव कुटुंबकम'' ही आपली धारणा होती. त्यामुळे कोणावर सत्ता गाजविणे, आक्रमण करणे, फसविणे, लुटणे, आपल्या रक्तातच नाही. आता आपणास राजकीय स्वातंत्र्य मिळाले आहे, पण सांस्कृतिक दृष्ट्या आपण पारतंत्र्यातच आहोत. हे पारतंत्र्य झुगारून देऊन, भारताला परत एकदा अखिल विश्वाचा ज्ञानगुरू व आर्थिक महासत्ता बनविण्यामध्ये हातभार लावणे, हे विज्ञान भारतीचे ध्येय आहे.




SRISHTIDNYAN (RNI No. 21321/1973 Dt. 11 Oct. 20 100)
'सृष्टिज्ञान' हे मासिक मालक विज्ञान भारती पुणे यांचे साठी मुद्रक व प्रकाशक रमेश दाते यांनी प्रतिमा ऑफसेट, कोथरुड इंडस्ट्रियल एरिया, कोथरुड, पुणे ४११०३८. येथे छापून विज्ञान भारती १२६१ शुक्रवार पेठ, काशी निवास, सुभाषनगर, गल्ली क्र.६, पुणे ४११००२. येथे प्रसिध्द केले.

*सर्वे भवन्तु सुखीनः !*
*सर्वे संतु निरामयः !*
*सर्वे भद्राणि पश्यंतु !*

म्हणजेच सर्वांनी सुखी, स्वास्थ्यपूर्ण व ज्ञानी असावे ही विज्ञान भारतीची दृष्टी आहे. यासाठी योग पद्धतीने जीवन जगणे, आयुर्वेद जगभर पसरणे, आणि पसायदान ही विश्वप्रार्थना बनणे आवश्यक आहे. यासाठी ज्ञानभाषा, म्हणून मराठीकडे आपण पाहिले.

मराठी ही अलौकिक सौंदर्य असलेली, समृद्ध बोलीभाषा आहे. आद्य कवी मुकुंदराय यांनी व नंतर ज्ञानियांचा राजा, ज्ञानेश्वर महाराजांनी मराठी ही ज्ञानभाषा होईल, असा पाया रचलाच आहे. भाषा म्हणजे केवळ शब्दांची देवाणघेवाण नाही, तर भाषेशी विचार, भावना, संस्कार, मन आणि संस्कृती जुळलेली असते. मनातील विचार व्यक्त करण्याचे साधन व माध्यम म्हणजे भाषा. सर्वात अधिक प्रभावीपणे आपले विचार व्यक्त करता येतात ते केवळ मातृभाषेतूनच. माणूस घडविण्याच्या प्रक्रियेत मातृभाषेचे ज्ञान सुद्धा फार महत्त्वाचे आहे. सुदैवाने आपली मातृभाषा मराठी आहे. तिच्यातच विश्वाची ज्ञानभाषा होण्याची क्षमता आहे. ज्ञानभाषा म्हणजे ज्ञान मिळविणे, ज्ञान जतन करणे, ज्ञान संवर्धन करणे आणि ज्ञानाची देवाणघेवाण करण्याची भाषा. या दृष्टीने मराठीतून विज्ञान प्रसार करणाऱ्या सृष्टिज्ञान मासिकाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. अखंडितपणे ९५ वर्ष चाललेला हा ज्ञान यज्ञ, नवनवीन बदलांना स्वीकारून, जुन्याचा आधार घेत घेत, प्रगतीची शिखरे पादाक्रांत करील व पुढील वाटचाल करीत राहील, यासाठी विज्ञान भारती कटिबद्ध आहे.

कोणी सांगावे, उद्या सृष्टिज्ञान मधील लेखाचे भाषांतर ''नेचर'' या जगप्रसिद्ध असलेल्या विज्ञान विषयक नियतकालिकात सुद्धा दिसेल.

मागे वळून पाहता, १९३३ ते १९७५ या ४२ वर्षाच्या कालावधीत, आर्यभूषण मुद्रणालय यांनी सृष्टिज्ञानची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. १९७५ पासून गेली ४७ वर्षे, महात्मा फुले वस्तू संग्रहालयाने सृष्टिज्ञान मासिकाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी पेलली होती. संग्रहालयाचे संचालक आणि मासिकाचे मुख्य संपादक, श्री. राजीव विळेकर यांनी संपादक मंडळाला अतिशय सक्षमपणे आधार आणि उत्तम साथ दिली. मासिक अखंडित प्रसारित होईल याकडे विशेष लक्ष पुरविले. मासिकाचे वितरण व इतर कार्यालयीन कामकाज चांगल्या प्रकारे चालविले. विशेष उल्लेख करायला हवा की, गेली बारा वर्षे कार्यकारी संपादक या नात्याने, सौ. कविता भालेराव यांनी जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली. मासिका चे अंतरंग व बहिरंग सुधारण्यासाठी त्यांनी अतोनात कष्ट घेतले. मासिकाची मांडणी आणि सजावट उत्तम व आकर्षक करण्यात अनुपम क्रिएशनचे, मिलिंद जोशी यांचे कायम उत्तम सहकार्य मिळत होते. तर प्रतिमा ऑफसेटचे अजित ठोंबरे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीने मासिकाची छपाई नेहमीच दर्जेदार झाली. संपादक मंडळातील इतर सदस्य, म्हणजे डॉ. क कृ. क्षीरसागर, स. वि. पाडळीकर, डॉ. रघुराज घोलप, रमेश दाते, जयंत खेडकर, डॉ.अजित वर्तक, यांनीही अंक अखंडित प्रकाशित व्हावा, यासाठी सर्व प्रकारचे सहकार्य स्वयंसेवी भावनेने केले.

याबद्दल या सर्वांचे आभार कसे मानावे हेच मला कळत नाही.

या पुढची वाटचाल विज्ञानभारतीस करायची आहे आणि येत्या काही महिन्यातच मासिकाचे याहून सुधारलेले स्वरूप आपल्याला पाहायला मिळेल.

या अंकामध्ये केंद्रीय अर्थसंकल्प २०२३–२४ यामध्ये विज्ञान तंत्रज्ञानाला दिलेले महत्त्व अधोरेखित करण्याचा अंशतः प्रयत्न केला आहे.

**रमेश दाते**
sci.vibha@gmail.com

# || मार्गदर्शकांचे आशीर्वाद ||



आजच्या वैज्ञानिक युगासाठी ''न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते म्हणण्यापेक्षा न हि ज्ञानेन, विज्ञानेन, तंत्रज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते'' असे म्हणणे अधिक संयुक्तिक ठरेल. आणि याचे उपयोजन फक्त मानवासाठी न होता संतुलित निसर्गासाठी होणे आवश्यक आहे. या दृष्टीने सृष्टिज्ञान ही संकल्पना अतिशय महत्वाची ठरते.

हेच कार्य ९५ वर्षे पूर्ण करून शंभरीकडे वाटचाल करणारे सृष्टिज्ञान मासिक करत आहे. या मासिकाने एके काळी अनेक शास्त्रज्ञ व संशोधकांना स्फूर्ती दिली होती. आणि साप्रतच्या काळीसुध्दा ती देण्याची क्षमता अशा शास्त्रीय विषयला वाहिलेल्या या नियतकालिकामध्ये आहे.

विज्ञान भारतीच्या नेतृत्वाखाली सृष्टिज्ञानच्या भविष्यातील वाटचालीसाठी अनेक शुभेच्छा..!

**डॉ. रघुनाथ माशेलकर**



सृष्टिज्ञान मासिक १९२८ साली प्राचार्य गो.रा. परांजपे यांच्या प्रेरणेतून सुरू झाले. श्री. परांजपे त्याकाळात जर्मनी येथे गेले असता तेथे लहानथोर मंडळींसाठी सुरू असलेली विज्ञान विषयाला वाहून घेतलेली मासिके, वृत्तपत्रातील शास्त्रीय विषयांचे महत्व अधोरेखित करणारे लेख पाहून ते खूप प्रभावित झाले, यातूनच गेली ९५ वर्षे उत्तमोत्तम शास्त्रीय विषय सर्वसामान्यांना कळतील अशा सोप्या भराठी भाषेत सृष्टिज्ञान मासिकाद्वारे लोकांसमोर आले.

आता विज्ञान भारतीच्या नेतृत्वाखाली या मासिकाचा दर्जा उत्तरोत्तर वृध्दिगंत व्हावा या

**डॉ. अनिल काकोडकर**



विज्ञान आणि तंत्रज्ञान याचा विकास गेल्या शतकापासून भूमिती श्रेणीने होत आहे. दहा बारा वर्षांच्या टप्प्यात हे आपण अनुभवत आहोत. त्यांचे विविध परिणाम अनुभवाला येत आहेत, ते समाजाला हितकारक असावेत या दृष्टीने समाजातील प्रत्येक घटकाला ते समजणे आवश्यक आहे. त्यासाठी ''सृष्टिज्ञान'' मासिक हे प्रभावी माध्यम आहे. गेली ९५ वर्षे हे मासिक सातत्याने मराठीतून विज्ञान प्रसाराचे मौलिक कार्य प्रभावीपणे करीत आहे हे अभिमानास्पद आहे.

या मासिकाचे प्रकाशन आणि व्यवस्थापन आता विज्ञान भारतीकडे आले आहे. ही जबाबदारी विज्ञानभारती यशस्वीपणे पार पाडेल.

**डॉ. विजय भटकर**

कुलपती, नालंदा विश्वविद्यालय



आपल्या देशात प्राचार्य डॉ. गो. रा. परांजपे यांच्या कल्पनेतून साकारलेले आणि गेली ९५ वर्षे अविरतपणे मातृभाषेतून मराठी भाषिकांना विविध क्षेत्रातील वैज्ञानिक शोधांची सोप्या भाषेत माहिती करून देणारे हे मासिक खूप महत्वाचे कार्य करीत आहे.

नुकतीच या मासिकाची मुद्रण, प्रकाशन आणि वितरण व्यवस्था यांची जबाबदारी विज्ञान भारती या अखिल भारतीय अशा विज्ञान प्रसाराला वहिलेल्या संस्थेने आपल्या खांद्यावर घेतली आहे.

विज्ञान भारतीच्या सर्व कार्यकर्त्यांना या कार्यात उदंड यश लाभो व शताब्दीपूर्तीची वाटचाल पूर्ण करताना मासिकाचा मूळ हेतू साध्य करण्यात यश येवो ही सदिच्छा व शुभेच्छा...!

**डॉ. शेखर मांडे**

अध्यक्ष, विज्ञान भारती